■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३३० ■ सोमवार दि.१८ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 330 ■ Monday Dt. 18 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# तलवाड्यातील क्लबवर वादंग, पोलिसांचा कानाडोळा?

## शाखा उपाध्यक्षाने राजीनामा दिला तरी क्लब सुरू; कायदा-व्यवस्था मात्र झोपी?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564




# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी जामिनावर बाहेर येऊन क्लब चालवू लागले; पोलीस म्हणे आम्हाला काही दिसतच नाय?

## मनोरंजनार्थ क्लब चे नियम अधिकाऱ्यांना माहित आहेत का?
## हप्त्यांच्या आड पोलिसांची झोप; नियमबाह्य क्लबवर कारवाई शून्य!


## जिव गमावलेल्या मुलाच्या बापाचा अर्ज धुळ खातोय, तलवाडा पोलिसांचं लक्ष कुठंय?

**तलवाडा । प्रतिनिधी**

**तलवाडा येथे मनोरंजनार्थ क्लब सुरू असल्याने मोठी चर्चा रंगली आहे. संबंधित क्लबचे शाखा उपाध्यक्ष यांनी राजीनामा दिल्यानंतरही क्लब सुरूच असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी सर्रासपणे बाहेर येऊन या क्लबच्या माध्यमातून कामकाज करत असल्याचा आरोप आहे. मयत मुलाच्या वडिलांनी याबाबत पोलिसांकडे लेखी अर्ज दिला असतानाही पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संताप व्यक्त होत आहे. हप्ते घेऊन प्रशासन झोपेत असल्याचा संशय नागरिकांमध्ये व्यक्त केला जात असून, नियमांचे पालन न करणाऱ्या या क्लबवर कारवाई होणार की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मनोरंजनाच्या नावाखाली तलवाडा याठिकाणी राजरोज पाने पत्त्यांचे क्लब सुरू आहेत या ठिकाणी शासनाच्या नियमाने चालवण्यात येणारे परंतु प्रत्यक्ष कोणतेच नियम पाळण्यात येत नसणारे रम्मी खेळ सुरू असून या ठिकाणी कॉइन च्या नावाखाली अवैध जुगार चालवून अनेकांचे संसार उध्वस्त होत आहेत याकडे प्रशासनाचे लक्ष नसून, तलवाडा येथील एका क्लब च्या शाखा उपाध्यक्षाने बाँड वर राजीनामा दिला असून शाखा सुरूच आहे. हा राजीनामा अध्यक्षाकडे दिला असून त्याला स्वीकारण्याचा अधिकार आहे का ? याची पडताळणी अधिकाऱ्यांनी केली आहे का, ज्यांनी राजीनामा स्वीकारला तो ही जामिनावर बाहेर आलेला आरोपी असून त्यांना परवना कसा दिला? का दिला? हे ज्याची संस्था आहे त्यांना कायदेशीर विचारणा केली का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत असून तलवाड्यात आर्थिक लालचे पोटी गैर धंद्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी यांना वरिष्ठांनी तरी कानमंत्र द्यावा अशी अपेक्षा सामान्य जनतेची आहे. परंतु वरिष्ठ अधिकारी ही काहीच प्रतिसाद देत नसल्यामुळे स्थानिक अधिकारी व कर्मचारी

पान २ वर




### चौकशी आणि पडताळणी पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्या समोर करा?

वृत्तपत्रात बातम्या आल्यावर आमचे काहीच होत नाही असे मानणारे पोलिस यंत्रणा ही आमचे काहीच करू शकत नाही आम्ही त्यांना हप्ते देतो, असे उघडपणे बोलतात. यावरून अधिकारी आणि कर्मचारी यांची हतबलता दिसून येत आहे, कारण यांच्या नाकावर टिकून हे काळे धंदे करत असून आमचे कोणी काहीच करू शकत नाहीत अशा तोऱ्यात वागत आहेत. याच ठिकाणी शासनाने बंदी घातलेला गुटखा पुरवण्यात येत होता, परंतु आता शाखा चालवणारे हुशार झाले असून सभासदांना पुड्या, सिगारेट, तंबाखू खाण्यास रूमच्या बाहेर पाठवून खाण्यास सांगत असल्याचे समजते हे नियम आणि शासनाच्या निर्देशात बसत नाही तरी पोलिस कार्यवाही का करत नाहीत हा सवाल आता सामान्य लोक करू लागले असून, याचे हात आर्थिक दलदलीत खरच बरबटले आहेत का अशी शंका निर्माण होत आहे.

### गोपनीय कर्मचारीच अवैध धंदेवाल्यांच्या संपर्कात?

ज्यांच्याकडे अतिशय महत्वाची शाखा आहे ते गोपनीय कर्मचारीच दोन नंबर धंदेवाल्यांच्या संपर्कात असल्याचे छत्रपती शिवाजी महाराज चौक तलवाडा या ठिकाणी कित्येक वेळेस पत्रकार, सामान्य नागरिक यांनी पाहिले असल्याने हेच अवैध क्लब चालवणाऱ्या माहिती पुरवत असतील का ? असा प्रश्न गावातील नागरिक चर्चा करत असून याकडे वरिष्ठ अधिकारी का दुर्लक्ष करत आहेत हेच समजत नसल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

### नोटीस लिहल्या परंतु दिल्या नाहीत?

तलवाडा पोलिस ठाण्या मार्फत या मनोरंजनार्थ क्लब चालवण्यात येणाऱ्या ठिकाणी गुटका, सिगारेट, तंबाखू तर कधी कधी सभासदांना दारू पुरवण्यात येत असून हे नियमात आहे का, अशी नोटीस देऊन विचारणा करण्यात येणार असल्याचे एका जिम्मेदार पोलिस अधिकारी यांनी सांगितले, परंतु अद्याप पर्यंत नोटीस दिली का नाही हे अजून समजू शकले नाही, परंतु या क्लब वाल्यांनी गुटखा, तंबाखू, धूम्रपान करण्यास सभासदाना मज्जाव केला असल्याचे समजते, मग नोटीस काढली हे कोणाला माहीत होते, ही माहिती कोणी क्लब वाल्यांना दिली, ही माहिती पोलिस अधिकारी काढतील का? त्यांच्या अधिकार आणि हद्दीत असणाऱ्या क्लब ना नोटीस देतील का हे पहावे लागेल.

### हद्दीत अवैध धंदे बोकाळले?

तलवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत, अवैध देशी विदेशी दारू, गुटखा, खानावळीच्या नावाखाली हॉटेल मध्ये दारू विक्री, किराणा दुकानावर गुटका विक्री, टपऱ्यावर पेट्रोल विक्री, अवैध वाहतूक, रोहीतळ परिसरात पत्त्यांचे क्लब, रामपुरी परिसरात पत्त्यांचे जुगार, वाहेगाव परिसरात पत्त्यांचे जुगार यासह पोलिस ठाणे हद्दीतील अनेक ठिकाणी अवैध धंदे सुरू असल्याचे आढळून येते मग हे पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांना का दिसत नाहीत? का पाहून यासारवाकडे डोळेझाक होत आहे याची चौकशी आणि पडताळणी पोलिस अधीक्षक साहेबांनी करावी अशी मागणीच आता जनता करू लागली असून अशी जोरदार चर्चा सुरू आहे.

# परळी तालुक्यातील कौडगाव हुडा येथील नदीत चार चाकी गाडी गेली वाहून

## धनंजय मुंडे यांनी रात्रीतून हलवली यंत्रणा; गाडीतील चार पैकी तिघांना वाचवण्यात बचाव पथकांना यश






**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

परळी वैद्यनाथ तालुक्यातील बहुतांश भागात अतिवृष्टी सदृश परिस्थिती असून परिणामी गावागावांतील नद्यांना पूर आला आहे. याचा फटका कौडगाव हुडा येथील तरुणांना बसला असून कौडगाव हुडा येथील तरुणांची चार चाकी कार गाव नदीच्या पुरात रात्री उशिरा वाहून गेली. या गाडीतील चौघांपैकी तीन जणांना वाचवण्यात बचाव पथकांना यश आले सिरसाळा पोलीस ठाण्याचे दंबग व. धाडसी एपीआय. गोरखनाथ दहिफळे यांनी रात्री तीनच्या सुमारास पाण्यामध्ये उतरून अमर पोळ यांना वाचविण्यासाठी जीवाची परवा न करता झाडावर बसलेल्या एका व्यक्तीस रस्सी व दावे बांधून धाडसी एपीआय गोरखनाथ दहिफळे यांनी कसरत करून त्या व्यक्तीस वाचवण्याचा प्रयत्न केला व त्याला सुखरूप बाहेर काढून त्याच्या तब्येतीची विचारपूस केली असता त्याची तब्येत एकदम ओके असल्याने त्याला सरकारी पोलीसव्यांमध्ये बसवण्यात आले होते. एपीआय गोरखनाथ दहिफळे यांची सर्व परिसरातून धाडस केल्यामुळे त्यांचं सर्व सामान्य जनतेमध्ये सिरसाळा पोलीस ठाणे विषय समाधानकारक जनतेच्या भावना निर्माण झाले आहेत. असून एक तरुण मयत झाला असून त्याचे पार्थिव सिरसाळा येथील शासकीय

पान २ वर

# फॅशन शोमध्ये शौर्यची कामगिरी

## बीडमध्ये तुलसी समूहाकडून चॅम्प ऑन रॅम्प स्पर्धा

**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन यांच्या वतीने रविवारी (दि.१७ ऑगस्ट) चॅम्प ऑन रॅम्प या राज्यस्तरीय लहान मुलांच्या फॅशन शोचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांमधून लहानग्या स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग घेतला. रॅम्पवरच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणातून प्रत्येकाने आपले कौशल्य दाखवले.




याच स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूलचा शौर्य सुनील डोंगरे या लहानग्या स्पर्धकाने ३ ते ६ वयोगटात थेट टॉप-५ मध्ये स्थान मिळवत राज्य पातळीवर बीडचा झेंडा फडकावला. शौर्यच्या या यशामुळे त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. तुलसी एज्युकेशनचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांच्या संकल्पनेतून चॅम्प ऑन रॅम्प सिजन एक ही राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.यावेळी आयकर विभागाच्या उपआयुक्त श्रीमती नितीका विलास, चला हवा येऊ द्या फेम प्रसिद्ध विनोदी अभिनेते अंकुर वधावे, तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती दीपा रोडे यांचा समावेश होता. या सर्व मान्यवरांनी शौर्यच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे आणि मिळालेल्या यशाचे कौतुक केले.

तुलसी इंग्लिश स्कूलच्या यूकेजी वर्गाच्या शिक्षिका फातिमा शेख यांनी विद्यार्थ्यांची अतिशय उत्तम तयारी करून घेतली होती. प्राचार्या उमा जगतकर, शिक्षिका फातिमा शेख तसेच शौर्यचे आई-वडील यांच्या सततच्या प्रोत्साहन आणि मार्गदर्शनामुळेच हे यश शक्य झाले. शौर्यने आपल्या नैसर्गिक आकर्षक व्यक्तिमत्त्व, आत्मविश्वास व प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकली. शौर्यच्या पुढील शैक्षणिक व कलागुणांच्या प्रवासासाठी सर्व स्तरातून त्याला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# इथं मरणानंतरही मरणयातना संपेना! धोंडराई गावात भर पावसात उघड्यावरच अंत्यसंस्कार

## धोंडराईत स्मशानभूमी नसल्याने कसरत; अनेकदा होते मृतदेहाची विटंबना

**गेवराई । प्रतिनिधी**

देशाला स्वातंत्र्य मिळून सात दशकांचा कालावधी लोटला असला तरी अद्यापही स्माशनभूमी नसल्याने धोंडराई गावात मृतदेहांना उघड्यावरच अग्नी द्यावा लागत आहे. आता पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने मृत व्यक्तींवर अंत्यसंस्कार करताना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे अंत्यसंस्कार करण्यासाठी सुमारे १ किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. त्यामुळेच कोणी स्मशानभूमीसाठी जागा देते का? असे म्हणण्याची वेळ आली आहे.धोंडराई गाव सर्वाधिक लोकसंख्येचे गाव असुन आजही मूलभूत सुविधा पासून वंचित आहे याकडे ग्रामपंचायत कार्यालयाने दुर्लक्ष केले असल्याचे पाहायला मिळते पुढारी लोकांच्या जीवावर उदार होऊन काम करतात का असा सवाल उपस्थित होत आहे गावात मुख्यत्वे वृद्धच नागरिक राहिले आहेत. गावात इतर कोणत्याही प्रकारच्या सुविधा नसल्याने लोकांना अक्षरशः नरकयातना भोगाव्या लागतात. कोणतेही विकासकाम करायचे झाल्यास सभोवताली विद्यमान सरपंच सोशल



मीडियावर वर्किंग व्हायरल करण्यात व्यस्त असल्यामुळे अडचणी निर्माण होत आहेत. उदरनिर्वाहाचे साधनच शेती असल्याने कोणी सहजासहजी स्मशानभूमीसाठी जागा देण्यास तयार होत नाहीत. त्यासाठी कोणीतरी पुढाकार घेऊन हा प्रश्न निकाली काढणे गरजेचे आहे. जर रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात एखाद्याचे निधन झाले, तर गावकर्यांना प्रेत खांद्यावर घेऊन मोठ्या कष्टाने एक किलोमीटर अंतर पार करावे लागते. शेताच्या बांधावरून चिखल तुडवत काटच्याकुटच्यातून अरुंद पायवाटेने मृतदेह स्वतःच्या मालकीच्या शेतात नेत दहन करावा लागतो. अनेकदा भर पावसात अंत्यसंस्कार करावे लागत असल्याने मृतदेह पूर्णपणे जळत नाही आणि मृत व्यक्तीची विटंबना सुद्धा होते. त्यामुळे एखाद्या व्यक्तीचा रात्रीच्या वेळी मृत्यू झाल्यास नातेवाईकांसह ग्रामस्थांवर अक्षरशः संकट ओढवते. त्यामुळेच स्मशानभूमीचा प्रश्न लवकरात लवकर निकाली निघणे आवश्यक आहे.

सविस्तर वृत्त असे की धोंडराई गावात दिनांक १७ ऑगस्ट रोजी गावातील एक माणूस मरण पावला होता पण स्मशानभूमी नसल्याने पावसाळ्यात उघड्यावर पावन हनुमान परिसरात सरकारी विहिरीच्या जवळ वडाच्या झाडाखाली स्वतःच्या खर्चाने शेड करून अंत्यसंस्कार करावे लागते हे अतिशय दुर्दैव म्हणावे लागेल असे असताना इतर लोकांनी याआधीही पावसात सरण पेटवले आहे यासाठी ग्रामस्थ नातेवाईक यांना मोठी कसरत करावी लागते शिवाय स्मशान भूमी कडे जाण्यासाठी रस्ता नसल्यानें ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत आहे गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला हा विषय मार्गी निघत नसल्यामुळें ग्रामस्थांची मोठी पंचाईत होत आहे गावचे लोकप्रतिनिधी विद्यमान सरपंच गावाला वेठीस धरत आहेत त्यामुळे गावातील व्यक्ती मयत झाल्यास त्यास उघड्यावर जाळण्याची वेळ ग्रामस्थांवर आहे दरम्यान धो धो पावसात सरण पेटण्याचा संघर्ष कधी थांबणार? ग्रामपंचायतीं वतीने स्मशानभूमी नसल्याने गावात मृत्यू पावणाऱ्या व्यक्तीचे अंत्यसंस्कार हे उघड्यावरच होत आहेत. भर पावसाळयात प्रेत जाळण्यासाठी कोणताही आधार नसल्याचे विदारक, संतापजनक चित्र सध्या दिसून येत आहे. यामुळे अंत्यसंस्कार होणार्या व्यक्तीच्या नातेवाईकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण होते.

तालुक्यातील सर्वात मोठी धोंडराई ग्रामपंचायतीमध्ये विकास कांमासाठी वर्षाला कोट्यवधी रुपये निधी खर्च केला जात आहे. मात्र एवढा निधी खर्च होत असतांना सुध्दा या धोंडराई ग्रामपंचायतीच्या वतीने स्मशानभुमी नसावी ?असा प्रश्न गेवराई तालुक्यातील व अंत्यविधीला येणाऱ्या नागरिकांना पडल्या शिवाय रहात नाही. या गावात आजही स्मशानभूमी नसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे स्मशान भूमी नसणाऱ्या गावात नागरिकांना भर पावसाळ्यात मोठया संकटांना सामोरे जावे लागत आहे. मृत्यूनंतर शेवटच्या क्षणी सुध्दा भर पावसात मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. गावातील लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. परंतु विद्यमान सरपंच व सन्माननीय सदस्य तसेच शासन प्रशासन या गंभीर असणाऱ्या बाबींकडे दुर्लक्ष करत आहे. कुठे तरी कुचकामी ठरत असल्याचा आरोप येथील नागरिकांकडुन केला जात आहे.

# एस.टी. महामंडळात अनियमिततेचा पर्दाफाश

## सहाय्यक यंत्र अभियंता निलेश पवार यांचा अनधिकृत चार्ज व बेकायदेशीर बदली व्यवहार

**बीड । प्रतिनिधी**

एस.टी. महामंडळातील गंभीर गैरव्यवहार आणि अनियमिततेचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विभागीय कार्यशाळा बीड येथे सहाय्यक यंत्र अभियंता पदावर असलेले श्री. निलेश पवार हे अधिकृतपणे कर्मचारी वर्ग अधिकारी नसतानाही गेल्या अनेक महिन्यांपासून अनधिकृतरीत्या हा पदभार सांभाळत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, तत्कालीन विभाग नियंत्रक श्री. अजयकुमार हिंमत मोरे यांनी पवार यांना तात्पुरता चार्ज दिला होता. परंतु, सद्यस्थितीत कार्यरत विभाग नियंत्रक सौ. अनुजा दुसाने यांनीदेखील कोणतीही दखल न घेता, पवार यांना सतत हा पदभार सांभाळण्याची परवानगी दिली आहे. परिणामी, पवार हे नियमबाह्य पद्धतीने दोन पदे सांभाळत आहेत – एकीकडे सहाय्यक यंत्र अभियंता आणि दुसरीकडे कर्मचारी वर्ग अधिकारी!

भ्रष्टाचारासाठी चार्ज कायम? फक्त चार्जचीच नाही तर बदली प्रक्रियेतही संशयास्पद व्यवहार उघड झाले आहेत. सेवाज्येष्ठतेला बगल देत, नव्याने नियुक्त झालेल्या काही कर्मचाऱ्यांची काही महिन्यांतच बदली करून त्यांना इच्छित आगार किंवा विभागीय कार्यालयात नेमणूक करण्यात आली आहे. या कारवाया केवळ पक्षपाती, संशयास्पद आणि भ्रष्टाचाराला पोषक असल्याचा आरोप होत आहे. वंचित बहुजन आघाडीचा तीव्र आक्रोश या सर्व प्रकारांविरोधात वंचित बहुजन आघाडी – बीड पश्चिमचे जिल्हाध्यक्ष प्रतीक (अजय) सरवदे यांनी तीव्र आक्रोश व्यक्त केला असून, परिवहन मंत्री, राज्यमंत्री, अतिरिक्त मुख्य सचिव, महाव्यवस्थापक तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्याकडे तक्रार नोंदवली आहे.

सरवदे यांची ठाम मागणी निलेश पवार यांचा अनधिकृत चार्ज तात्काळ काढून घेण्यात यावा, त्यांच्या कार्यकाळातील सर्व कामकाज व बदली प्रकरणांची स्वतंत्र चौकशी समितीकडून तपासणी करण्यात यावी, दोषींवर आवश्यक ती प्रशासकीय व शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात यावी. शासन व प्रशासनावर दबाव सरवदे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर शासनाने तातडीने कारवाई केली नाही तर वंचित बहुजन आघाडी उग्र आंदोलन उभारेल आणि बीड जिल्ह्यातील एस.टी. प्रशासनाला जबाबदार धरले जाईल.

# जयदत्त क्षीरसागर यांच्या जीवन कार्यावर राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

**शिरूर कासार । प्रतिनिधी**



येथील कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय आणि वांग्मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून निबंध मागविण्यात येत आहे. जयदत्त (अण्णा) क्षीरसागर: सामाजिक न्यायाचा योद्धा व जयदत्त (अण्णा) क्षीरसागर: सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय कार्य या दोन विषयांवर दिनांक १५ सप्टेंबर २०२५ पूर्वी ळारसश किंवा झऊऋ स्वरूपात आपले हस्तलिखित निबंध ९०९६६८४७६८ या व्हाट्सअप क्रमांक वर पाठवावे असे आवाहन वांग्मय मंडळ अध्यक्ष डॉ. रमेश लांडगे यांनी केले आहे.

आलेल्या सर्व निबंधाचे आयएसबीएन क्रमांक असलेले गौरव ग्रंथ प्रकाशित करणार असून पहिल्या तीन उत्कृष्ट निबंध लिहिणाऱ्या विद्यार्थ्यास रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

# परळी शहर आणि परीसरात दहशत निर्माण करुन दादागिरी करणाऱ्या एका धोकादायक गुंडाची एमपीडीए कायद्याअंतर्गत हर्सल कारागृहात रवानगी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत भापोसे यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्हयातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन एमपीडीए कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कारवाई करण्याचे योजिले आहे. त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन भाप्रसे यांची खंबीर साथ लाभली आहे. त्या अनुषघांने पो.अ. बीड यांचे सुचनेवरुन पो.नि. रघुनाथ नाचण पोलीस ठाणे परळी शहर यांनी दि.११.०७.२०२५ रोजी इसम नामे शुभम दशरथ जाधव वय ३२ वर्षे रा. नैकोटा ता. सोनपेठ जि. परभणी ह.मु. विद्यानगर परळी वै. ता. परळी जि. बीड याचे विरूध्द एमपीडीए कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने जिल्हादंडाधिकारी बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसमा विरुध्द पोलीस ठाणे परळी शहर व सोनपेठ येथे खुनाचा प्रयत्न करणे, अपहरण करणे, गंभीर दुखापत करणे, अवैध शस्त्र बाळगणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, शिवीगाळ करणे वगैरे गंभीर स्वरुपाचे एकुण ०४ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यापैकी ०२ गुन्हे न्यायप्रविष्ठ असुन ०२ गुन्हे पोलीस तपासावर आहे. तसेच नमुद इसमावर त्याने आपली वर्तनुक सुधारावी म्हणुन यापुर्वी एक वेळा प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गुन्हे करण्याची श्रृंखला चालुच ठेवुन होता. त्याची परळी शहर व परीसरात प्रचंड दहशत आहे. त्याचे विरुध्द लोक फिर्याद देण्यास अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. तो सर्वसामान्य लोकांना त्रास देवुन दहशत निर्माण करुन, सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचवत होता.



सदर प्रकरणांत जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिनांक १८.०८.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्सल कारागृह छ. संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले आहे. त्यावरुन पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना पो.स्टे. परळी शहर व पो. नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. त्यावरुन गोपणीय खबऱ्याच्या आधारे पोनि शिवाजी बंटेवाड यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फतीने आज दिनांक १८.०८.२०२५ रोजी सदर इसमास परळी शहरातुन ताब्यात घेऊन पो. स्टे. परळी शहर येथे हजर केले. त्यांनतर पो.नि. परळी शहर यांनी सदर इसमास आज दिनांक १८.०८.२०२५ रोजी १५.५२ वा. कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन त्यास योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छ. संभाजीनगर येथे स्थानबध्द करण्यासाठी रवाना केले.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत भापोसे, अपोअ बीड, चेतना तिडके, उपविपोअ अंबाजोगाई ऋषीकेश शिंदे (अपोअ) पो.नि. शिवाजी बंटेवाड स्थागुशा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. रघुनाथ नाचण, सपोनि नितीन गड्डवार, पोह किशोर घटमाळ पंडीत पांचाळ, सर्व पो.स्टे. परळी शहर तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, गोविंद भताणे, रामचंद्र केक्काण, सचिन आंधळे, बिबीषण चव्हाण सर्व नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर तसेच मटका, लॉटरी जुगार खेळाणाऱ्या व खेळविणाऱ्या जास्तीत जास्त चझऊ- कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनीत काँवत भापोसे यांनी दिले आहेत.

# पुण्यात जबरी चोरी करणारे तिघे बीडमध्ये अटक

**आंतरजिल्हा पोलीस समन्वय्याने मिळाले आरोपी**

**बीड । प्रतिनिधी**

आंतरजिल्हा गुन्हेगारावर नजर ठेवावी आणि वेळीच त्यांना अटक करावी अशा सक्त सूचना पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सर्व पोलिसांना दिलेले आहेत. घटनेची हकीगत अशी की, दिनांक १२/०८/२०२५ रोजी मौजे कुरुळी, ता.खेड जि.पुणे या भागात कमलाकर बाबाजी मोहिते हे सकाळी १० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पिकअप गाडीने जात असताना तीन अनोळखी इसमानी त्याचा पाठलाग करून त्यांची गाडी अडवून त्यांना आरोपींच्या मारुती स्विफ्ट या गाडीत शिवीगाळ व मारहाण करून बसवले व मुळशेवाडी येथे इंडियन ऑइल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे नेऊन लूटमार करण्यात आली होती आणि यामध्ये कमलाकर मोहिते यांच्या बँक खात्यात पैसे नसल्याने आरोपींनी त्यांना त्यांच्या ओळखीच्या व्यक्तीकडून फोनपे



च्या माध्यमातून २४३०० रुपये घेतले तसेच त्यांच्याकडील रोख रक्कम १५००० रुपये व महाराष्ट्र बँकेचे ए टी एम कार्ड असा एकूण ३९५०० रुपयाचा ऐवज लुटण्यात आला होता.

या गुन्ह्यातील तीन आरोपी नामे १. नितिन मधुकर शिंदे, वय २६ वर्ष, रा. चाकण, पुणे २. वैभव गीताराम माने, वय २३ वर्ष, रा. चाकण, पुणे ३. विशाल ज्ञानोबा जाधव, वय ३२ वर्ष, रा. रमाई चौक, बीड हे गुन्हा करून फरार झाले होते परंतु पोलीस ठाणे म्हाळुंगे यांना खात्रीशीर माहिती मिळाली होती की ते बीडमध्ये आलेले आहेत. सकाळी त्याचा संदेश आल्यानंतर बीड शहर डीबी पथकाचे पीएसआय महेश जाधव आणि पोह राठोड, बावनकर, पोअ राम पवार यांनी त्यांचा शहरभर शोध घेतला असता त्यांना एके ठिकाणी त्यांची गाडी लावलेली आढळून आली. त्या ठिकाणी मग सापळा रचला. परंतु दिवसभर ते त्या सापळ्यामध्ये अडकले नाही.. परंतु रात्री साडेदहाच्या सुमारास ते अलगद त्या सापळ्यात अडकले आणि तिघेही आरोपी पोलिसांच्या हाती लागले.

या संपूर्ण प्रकरणांमध्ये पुणे पोलीस आणि बीड शहर पोलीस यांचा समन्वय अनोखा ठरला. अशाप्रकारे समन्वयातून अंतर जिल्हा गुन्हे करणारी टोळी ही पकडण्यात आलेली आहे. येथेही त्यांचा अशाच प्रकारचा गुन्हा करण्याचा उद्देश होता हे तपासा स्पष्ट झाले आहे. ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांचे बीड शहर डीबी पथकातील पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोह राठोड, पोह बावनकर, पोअ पवार केली आहे.

# गुत्तेदारीसाठी राजकारण करणाऱ्यांनी नागरिकांची दिशाभूल करू नये : नगरसेवक ॲड. विकास जोगदंड

**बीड । प्रतिनिधी**

१८ ऑगस्ट महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान (राज्यस्तर) अंतर्गत बीड नगरपरिषद हद्दीतील प्रमुख रस्त्यांसाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे कडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी निधी मागणी करत पाठपुरावा केल्याने जिल्हा सह आयुक्त नगर परिषद प्रशासन विभाग यांनी दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी प्रधान सचिव नगर विकास विभाग नवी-२ यांना तसेच आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय बेलापूर भवन, मुंबई यांचेकडे प्रशासकीय स्तरावरून मान्यता मिळावी याकरिता १,३७,८१,३७,९४२ रु चा प्रस्ताव पाठविला असून सदरील प्रस्तावास लवकरच मान्यता मिळेल आणि शहरातील प्रमुख रस्त्याचा प्रश्न मार्गी लागून बीड शहरातील विकासात्मक सौंदर्यात आणखी भर पडेल परंतु अर्ध्या हळकुंडात पिवळे झालेले निव्वळ स्वार्थासाठी



राजकारणात आलेले भ्रष्ट अधिकाऱ्याची पाठराखण करून मलिदा लाटणारे निवडणुका डोळ्यासमोर ठेवून स्वार्थ साधणारे काही पक्षाचे जिल्हा पदाधिकारी यांनी बीड शहरातील सुजाण नागरिकांची दिशाभूल करू नये असे आव्हान भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/अध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. विकास जोगदंड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केले आहे. तसेच घोडा मैदान जवळ असून आगामी नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी सर्व सामान्य नागरिक उभा असून विकासात्मक नेतृत्वालाच प्राधान्य देईल असा विश्वास ही शेवटी माजी नगरसेवक ॲड. विकास जोगदंड यांनी पत्रकातून व्यक्त केला आहे.

# तलवाडा गाव तलाव लगट आतिक्रमण वाढल्याने मुख्य रोडवर अपघात होता होता टळला!

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव संरक्षण भीती लगट वाढलेल्या आतिक्रमण मुळे रहदारीच्या मुख्य रस्त्याला देखील अडथळा निर्माण होत असुन दिनांक १७/८/२०२५ रोजी भरधाव वेगात दोन्ही बाजुने आचानक वाहने आल्याने एका व्यक्तीस जिव वाचवण्यासाठी रोडच्या बाजूला ऊडी मारावी लागली सुदैवाने जिवितहानी टळली असलीतरी या रस्त्याने सातत्याने शाळकरी विध्यार्थ्यांसह ईतर वाटसरुंची मोठ्या प्रमाणात वर्दळ आसते. रविवार आसल्याने शाळांना सुट्टी होती. नसता मोठी दुर्घटना झाली असती.

या निमित्ताने मोठा अनर्थ टळल्याची या वेळी चर्चा ऐकावयास भेटली याच मुख्य रस्त्याला गाव तलावची संरक्षण भींत असुन संरक्षण भींत ते मुख्य डांबरी रस्ता आतिक्रमण धारकांनी पुर्णपणे वेढला आसल्याने बस स्थानककडे जाणाऱ्या शासकीय बसेस सह खाजगी वाहन चालकांना तारेवरची कसरत करत वाहन चालावे लागत आसल्याचे अनेक वेळा



दिसुन आलेले आहे. अनेक बस चालकांनी बसेस ऊभे करुन तलवाडा येथील पत्रकार व लोकप्रतिनिधींना या रस्ता रुंदी करना बाबत विनंती केलेली आहे. या रस्त्याच्या आतिक्रमण धारकांनी तलवाडा गाव तलाव संरक्षण भींत कोरुन गाव तलावाच्या संरक्षण भींतीला धोका तर निर्माण केलाच आहे जेणे करुन गाव तलाव फुटण्याचा धोखा वाढलेला दिसुन येत आसतांनाच संरक्षण भींत ते मुख्य डांबरी सडक पर्यंत आतिक्रमण वाढल्याने रहदारीला मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आसल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. याच मुख्य डांबरी रस्त्याने सर्व शासकीय कार्य लये शाळा, कालेज, शासकीय रुग्णालय, बस स्थानक, बँका, बाजार रोड सर्व याच रस्त्यावर आसल्याने मोठी दुर्घटना होण्याची शक्यता या निमित्ताने वर्तवली जात असुन संबधित प्रशासन एखाद्याचा जिव गेल्यावर हे अतिक्रमण हाटवणार का असा सवाल तलवाडाकर व पंचक्रोशीतील लोक या निमित्ताने उपस्थित करु लागले आहे.

पान १ वरून...

### खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी जामिनावर बाहेर येऊन कल्ब चालवू लागले; पोलीस म्हणे आम्हाला काही दिसतच नाय?

आर्थिक मलिदा घेऊन दोन नंबर धंदेवाल्याची हुजरेगिरी करण्यात आनंद मानतात ही शोकांतिका आहे.

जिल्ह्यात केज येथील सरपंच हत्या प्रकरण उघडकीस आल्या नंतर पोलिस पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पदभार घेतला आणि जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सर्वच अवैध धंदे कायमस्वरूपी बंद करण्याचे आदेश पोलिस यंत्रणेला दिले, सुरूवातीला एसपी नवीन आहेत, कडक आहेत, डायरेक्ट गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना कायद्याने सरळ करतात म्हणून सर्वच धंदे बंद झाले. आजही पोलिस अधीक्षक हे अवैध धंद्याच्या विरोधात आहेत परंतु तालुका ठिकाणचे उपविभागीय पोलीस अधिकारी आणि ग्रामीण पोलीस स्टेशन चे अधिकारी यांच्या सहकार्य आणि संगम मताने काही प्रमाणात काळा बाजार सुरू झाला आहे. यामध्ये सुरुवातीला उघड पाने चालवण्यात येत असणारा पत्याचा क्लब आता शासनाच्या नियमानुसार दिसणाऱ्या धंद्यात येत असल्याने चालवणाऱ्यांची मुजोरी वाढली असून पोलिस प्रशासनाची हतबलता पुढे येत आहे. हे क्लब आता संस्था चालक हजार, दीड हजार किंवा दोन हजार रुपये रोज प्रमाणे देऊन गावोगावी आणि सर्कल च्या ठिकाणी सुरू करून महिन्याला पन्नास ते साठ हजार रुपये एका शाखे कडून कमवत आहेत. अशा एका संस्था चालकाच्या महाराष्ट्र जर शंभर शाखा असतील तर तो संस्था चालक किती महिना कमावतो आणि शासनाला किती जीएसटी भरतो हा प्रश्न पडतो आहे. अशाच दोन शाखा तलवाडा येथे असून एका शाखेत खुनाच्या गुन्ह्यातील जामिनावर सुटलेले आरोपीचं शाखेत असल्याने गुन्हेगारी वृत्तीला बळ मिळत असून भविष्यात नक्कीच मोठा गुन्हा ही घडू शकतो. यातील एका आरोपीने मयत मुलाच्या वडिलांना मारहाण करेल, आमचे काहीच होत नाही अशी धमकी दिली असल्याची तक्रार तलवाडा पोलिसात दिली आहे, यावर पोलिसांनी काय कार्यवाही केली हे अद्याप कळू शकले नसून या गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या लोकांना दोन नंबरचे धंदे करण्याची संमती पोलिस प्रशासन का देते हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### परळी तालुक्यातील कौडगाव हुडा येथील नदीत चार चाकी गाडी गेली वाहून

रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. रविवारी मध्यरात्री कौडगाव – कासारवाडी रस्त्यावर मारुती बलिनो गाडी पुरात वाहून गेली. ही घटना रविवारी रात्री ११:३० ते १२ च्या दरम्यान घडली असून या घटनेची माहिती स्थानिकांनी तत्काळ या भागाचे आमदार धनंजय मुंडे यांना कळवली आता श्री मुंडे यांनी तात्काळ प्रशासकीय यंत्रणांना सज्ज करून बचाव कार्याला वेग आणला. उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, उपविभागीय पोलिस अधिकारी, सिरसाळा पोलीस ठाण्याचे सपोनी गोरक्षनाथ दहिफळे, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, जगमीत्र कार्यालयाचे समन्वयक बाबुराव रुपनर हे बचाव पथकांना घेऊन मध्यरात्री घटना स्थळी दाखल झाले होते. पाण्याचा प्रवाह अत्यंत जास्त असल्याने बचाव कार्याला अडथळे येत होते, त्यामुळे धनंजय मुंडे यांच्या मार्फत बीडचे जिल्हाधिकारी तसेच पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या कार्यालयास संपर्क करून एन डी आर एफ च्या पथकास पाचारण करण्यात आले. हे पथकही तातडीने रवाना झाले.

दरम्यान या घटनेत वाहून गेलेल्या अमर मधुकर पौळ (वय २२) रा. डिग्रस, राहुल संपती पौळ (वय ३२), राहुल सटवाजी नवले (वय २२) रा. फुलारवाडी ता. पाथ्री या तिघांना सुखरूप बाहेर काढण्यात यंत्रणांना यश आले असून विशाल बल्लाळ (वय २४) रा. बोरी सावरगाव ता. केज हा तरुण मयत झाला असून त्याचा मृतदेह सिरसाळा येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

पहाटे युवक नेते अजय मुंडे हे घटनास्थळी दाखल झाले होते, त्यांनी ग्रामस्थांशी व प्रशासकीय यंत्रणांशी चर्चा केली. धनंजय मुंडे हेही दूरध्वनीवरून रात्रभर यंत्रणांच्या संपर्कात होते, तसेच त्यांचे सहकारी राजाभाऊ पौळ, सुभाष नाटकर, तसेच धनंजय मुंडे यांच्या जगमित्र कार्यालयाची टीम घटनास्थळी मदत कार्यात उपस्थिती होती.

# धारूरमध्ये जमीयत उलेमा-ए-हिंदचा मोठा निर्णय: असद भाई कुरेशी पुन्हा तालुकाध्यक्ष

## एकमताने निर्णय : असद भाई कुरेशी पुन्हा तालुकाध्यक्षपदी निवड; धारूर समाचार मंच

**धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील जमीयत उलेमा-ए-हिंदच्या निवडणूक बैठकीत एक ऐतिहासिक व महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या बैठकीत असद भाई कुरेशी यांची दुसऱ्यांदा तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांच्या पुनर्निवडीमुळे धारूर तालुक्यातील जमीयतच्या कार्याला नवे बळ आणि दिशा मिळणार असून, कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे.



बैठक धारूर शहरात मोठ्या संख्येने झालेल्या उपस्थितीत पार पडली. यावेळी जमीयत उलेमा-ए-हिंद बीड जिल्हा अध्यक्ष मौलाना अब्दुल्ला, बीड जिल्हा जनरल सेक्रेटरी मौलाना साबीर साहब तसेच तालुक्यातील विविध गावांतील जबाबदार, कार्यकर्ते आणि सदस्य मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. बैठकीचे वातावरण गंभीर तसेच उत्साही होते. सुरुवातीला मागील कार्यकाळाचा आढावा घेताना संघटनेने केलेल्या सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक उपक्रमांचा विशेष उल्लेख करण्यात आला. समाजातील शैक्षणिक प्रगतीसाठी राबविलेल्या मोहिमा, गरीब व वंचित घटकांना दिलेला आधार तसेच युवकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी केलेले प्रयत्न अधोरेखित करण्यात आले.

बैठकीत पुढील कार्ययोजनेवर सविस्तर चर्चा झाली. त्यात विशेषतः शिक्षणाच्या क्षेत्रात मुला-मुलींना संधी उपलब्ध करून देणे, धार्मिक सौहार्द वाढवणे, संघटनेत युवकांना सक्रीय करणे, सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करणे आणि वंचित समाजघटकांच्या समस्यांना प्राधान्य देणे या मुद्द्यांवर भर देण्यात आला. यामुळे जमीयत उलेमा-ए-हिंदची धारूर तालुक्यातील भूमिका अधिक मजबूत होणार असल्याचे स्पष्ट झाले. यानंतर एकमताने असद भाई कुरेशी यांची दुसऱ्यांदा तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. कार्यकर्त्यांच्या टाळ्यांच्या गजरात त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आणि सर्वांनी उभे राहून त्यांचे स्वागत केले. या क्षणी संपूर्ण सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. निवडीनंतर असद भाई कुरेशी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, जमीयत उलेमा-ए-हिंदच्या माध्यमातून समाजाच्या शैक्षणिक आणि सामाजिक उन्नतीसाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्नशील राहणार आहे. माझ्यावर पुन्हा दाखविलेल्या विश्वासाबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. संघटनेच्या माध्यमातून मला दिलेली ही जबाबदारी मी पूर्ण ताकदीने पार पाडीन आणि समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीन.

त्यांच्या या भाषणानंतर उपस्थित सर्व मान्यवरांनी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले आणि आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. जिल्हा अध्यक्ष मौलाना अब्दुल्ला साहब यांनी आपल्या भाषणात सांगितले की, असद भाई कुरेशी यांच्या नेतृत्वाखाली धारूर तालुक्यातील जमीयतचे कार्य अधिक बळकट होईल. समाजहिताचे कार्य हेच आमचे प्राधान्य आहे आणि कुरेशी साहेब त्यात निश्चितच यशस्वी ठरतील.

या पुनर्निवडीमुळे धारूर तालुक्यातील जमीयत उलेमा-ए-हिंदच्या कार्यात नवचैतन्य निर्माण झाले आहे. समाजहिताचे उपक्रम, शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी आणि धार्मिक कार्याची गती यामध्ये वाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. एकंदरित पाहता, असद भाई कुरेशी यांची दुसऱ्यांदा झालेली तालुकाध्यक्षपदी निवड ही फक्त एका व्यक्तीची पुनर्निवड नसून, धारूर तालुक्यातील संपूर्ण जमीयतच्या संघटनात्मक ताकदीचे आणि समाजाच्या विश्वासाचे प्रतीक ठरली आहे.



# BDS शिक्षणासाठी पात्र झाल्याबद्दल आडसकरांकडून कौतुकाची थाप

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यात धनेगाव येथील माजी सरपंच सुहास गुजर यांची कन्या कु.श्रावणी सुहास गुजर हीची दंतवैद्यक शाखेतील Bachelor of Dental Surgery (BDS) या पदवी अभ्यासक्रमासाठी पात्रता मिळवली आहे. त्यांच्या या यशाबद्दल राष्ट्रवादी कांग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा अंबासाखर कारखान्याचे संचालक ऋषिकेश आडसकर त्यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास अंबेजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक ऋषिकेश आडसकर, माजी सरपंच सतिष गुजर, चेरमन विकास पाटील, कृ.बा.स.संचालक पशुपति पाटील, कृ.बा.संचालक रामकिसन बाबा खोडसे, शिवदास थळकरी, माजी सरपंच सुहास गुजर, रघुनंदन मोरे, बाळासाहेब नांदे, धनेश्वर गुजर, शंकर इंगळे, शाम खोडसे, गजानन गोरे, विशाल खोडसे, अमरदीप शिंदे उपस्थित होते. कू.श्रावणी सुहास गुजर हीने मेहनती अभ्यासात सातत्य ठेऊन यश मिळवले असून पालकांचे मार्गदर्शन, तसेच शिक्षकांचा या यशात मोलाचा वाटा असल्याचे ऋषिकेश आडसकर यांनी बोलताना सांगितले. श्रवणीच्या पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देऊन उज्वल भवितव्यासाठी त्यांनी सदिच्छा व्यक्त केल्या.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त दिंद्रुड पोलीस ठाण्यात आयोजित महा रक्तदान शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त दिंद्रुड पोलीस ठाण्यात शुक्रवार दि.१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या महा रक्तदान शिबिरास रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी सर्व रक्तदात्यांचे सपोनि महादेव ढाकणे यांनी आभार व्यक्त केले.




भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यासाठी दिंद्रुड पोलीस ठाण्याच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अंबाजोगाईच्या अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, माजलगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१५ ऑगस्ट रोजी शुक्रवारी पोलीस ठाणे प्रांगणात महा रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ध्वजारोहण झाल्यानंतर सदर महारक्तदान शिबीर चालु करण्याताले.दुपारी ३ वाजेपर्यंत रक्तदान शिबीर चालु होते. यावेळी स्वतः सपोनि महादेव ढाकणे, पोलीस उपनिरीक्षक सलमान शेख, पोलीस उपनिरीक्षक संजय राठोड यांच्या पोलीस कर्मचारी तसेच दिंद्रुड पोलीस ठाणे हद्दीतील अनेक गावच्या नागरिकांनी या महा रक्तदान शिबिरात सहभागी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. गरजु रूग्णांना वेळेवर रक्त मिळुन, त्यांना जीवदान मिळावे. या उद्दात हेतु हे रक्तदान शिबीर घेण्या मागचा असल्याचे आयोजन सपोनि महादेव ढाकणे यांनी सांगत गेल्या कांही वर्षापासुन दिंद्रुड पोलीस ठाण्यात महा रक्तदान शिबिर घेण्यात येते. ती परंपरा याही वर्षी कायम ठेवली असून, या शिबिरास ठाणे हद्दीतील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिल्याचे सपोनि ढाकणे यांनी म्हटले. महारक्तदान शिबीरात रक्त संकलन करण्यास परळी येथील वैद्यनाथ रक्तपेढीची टीम आली होती. सदरील महा रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सपोनि महादेव ढाकणे यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक सलमान शेख, पोलीस उपनिरीक्षक संजय राठोड यांच्यासह मार्गदर्शनाखाली दिंद्रुड पोलीस ठाण्याच्या पोलीस कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# डॉ. गिरीश दळवींच्या पुढाकाराने थोरात नवदाम्पत्याकडून कल्पवृक्षारोपण

**दौलावडगाव । प्रतिनिधी**

अहिल्यानगर महानगरपालिकेत डॉक्टर म्हणून कार्यरत असलेले व निसर्गप्रेमी म्हणून परिचित असलेले केळ येथील डॉ. गिरीश दळवी यांच्या पुढाकाराने पर्यावरण संवर्धनाचा एक स्तुत्य उपक्रम नुकताच पार पडला. १२ ऑगस्ट रोजी आपला विवाह सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केलेले श्री. अर्जुनराव थोरात व चि.सौ.का. अक्षदा या नवदाम्पत्याच्या हस्ते रविवार दि. १७ ऑगस्ट रोजी त्यांच्या निवासस्थानी घरासमोर कल्पवृक्ष (नारळाचे झाड) लावण्यात आले.

या कौटुंबिक कार्यक्रम प्रसंगी, डॉ.गिरीश दळवी किरण हजारे, अजिनाथ थोरात, राहुल थोरात, कार्तिक थोरात आदी मान्यवर उपस्थित होते. पाहुण्यांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. जसे हे झाड वाढेल, फुलेल-फळेल तसेच या नवदाम्पत्याचे वैवाहिक जीवनही समृद्ध व आनंदमय होवो, अशा शुभेच्छा उपस्थितांनी व्यक्त केल्या. झाडे लावा - झाडे जगवा हा संदेश देत निसर्गाशी नाळ घट्ट ठेवण्याचा संकल्प या उपक्रमातून अधोरेखित झाला. नवदाम्पत्यानेही या हरित उपक्रमाचा भाग होऊन आपल्या नव्या संसाराची सुरुवात अधिक अर्थपूर्ण केल्याची भावना व्यक्त केली. डॉ. दळवींच्या पुढाकाराचे सर्व उपस्थितांनी कौतुक केले असून, नवदाम्पत्याच्या आयुष्यासोबतच लावलेले हे झाडही वाढत-फुलत राहो, असे शुभेच्छा व मंगलाशिर्वाद देण्यात आले. निसर्गप्रेम आणि पर्यावरण संवर्धनाची ही सुरेख सांगड समाजासाठी प्रेरणादायी ठरावी, अशी सर्वत्र अपेक्षा व्यक्त होत आहे.


# राखी ही बहिण-भावाच्या प्रेमाचे व रक्षणाचे प्रतीक आहे : प्राचार्य केशव भांगे

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

दि.१४ ऑगस्ट २०२५ गुरूवार रोजी आदर्श शिक्षण संस्था, बीड द्वारा संचलित,कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) येथे रक्षाबंधन हा उत्सव विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या उपस्थितीत आणि मोठ्या आनंदात पार पडला. इ.५ वी ते १२ वी वर्गातील सर्वच मुलांना तसेच प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांना मुलींच्या हस्ते राख्या बांधण्यात आल्या. यावेळी प्राचार्य भांगे साहेबांनी भाषणातून सांगितले की, भारतीय संस्कृतीत बहीण-भावाच्या प्रेम, रक्षण आणि काळजीचे प्रतीक म्हणजे 'रक्षाबंधन' होय. यामुळेच रक्षाबंधन या उत्सवाला मानवी जीवनात विशेष महत्व आहे. राखीचा धागा भावाच्या हातात बांधून बहिण औक्षण करून आपल्या पवीत्र नात्याची वीन अधिक घट्ट करते. अशा पवीत्र सणाचे महत्त्व लक्षात घेऊन आपल्या बहिणींचे संरक्षण करण्यासाठी सर्व भावांनी जबाबदारी घेतली पाहिजे, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.



यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे, विज्ञान प्रमुख प्रा.संजय काकडे, परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, क्रीडा प्रमुख श्री रविंद्र बडे, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.महारूद्र डोंगरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.संजय आव्हाड, प्रा.अनिल जरे, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.अशोक इनकर, प्रा.महादेव हांगे, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.नारायण तांबे, प्रा.दत्ता शिंदे, प्रा.लक्ष्मण गव्हाणे, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.विनोद गलांडे, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.शशिकांत जावळे, प्रा.अशोक घोडके, प्रा.सत्यनारायण ढवळे, प्रा.हनुमंत घायाळ, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ, प्रा.सिमा ढवळे, सौ.अनिता लाटे, आबासाहेब ढवळे, वसंत आहेर, राजू बडे, जयेंद्र निकम, आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर, प्रकाश साऊत, रविंद्र शिंदे तसेच प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



आज अंतरवाली सराटी येथे मराठा संघर्ष योद्धा श्री मनोज दादा जरांगे पाटील यांची भेट घेऊन सत्कार केला व येणाऱ्या २९ रोजी मुंबई येथे होणाऱ्या मराठा आरक्षण उपोषणास जाहीर पाठिंबा दिला यावेळी माझ्याबरोबर मराठा सेवक उपस्थित.

# एमएससी एम्ब्रियोलॉजी मध्ये शेख जाफर सुलतान विशेष प्राविण्याने उत्तीर्ण

## आई-वडिलांच्या परिश्रमाचे सार्थक केले : एस.एम.युसूफ

**बीड । प्रतिनिधी**

वैद्यकीय क्षेत्रातील एम.एस.सी. एम्ब्रियोलॉजी च्या अंतिम वर्षात शेख ज़ाफ़र सुलतान ने विशेष प्राविण्याने उत्तीर्ण होत त्याच्या बॅच मधून पहिला येण्याचा मान मिळविला आहे. त्याच्या या घवघवीत यशामुळे त्याने त्याच्या शिक्षणासाठी अविश्रांत परिश्रम घेतलेल्या आई-वडिलांच्या परिश्रमाचे सार्थक केले असे भावनिक मत त्याचे मामा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी व्यक्त केले आहे.

शेख ज़ाफ़र सुलतान प्राथमिक शिक्षणापासून ते एम.एस.सी. एम्ब्रियोलॉजी पर्यंतच्या शिक्षणात नेहमी विशेष प्राविण्याने उत्तीर्ण होत आला आहे. मग ते दहावी-बारावी बोर्डच्या परीक्षा असो की अन्य कोणत्याही परीक्षा. प्रत्येक परीक्षेत त्याने विशेष प्राविण्य कधी सोडले नाही. अशाच प्रकारे यंदाही एम.एस.सी. एम्ब्रियोलॉजी चे दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ अँड रिसर्च नागपूर येथे शिक्षण घेत अंतिम वर्षात त्याच्या बॅच मधून पहिला आला आहे. त्याने ७०० पैकी ५६५ गुण मिळविले आहे. त्याच्या या घवघवीत यशामुळे त्याने आतापर्यंतच्या शैक्षणिक वाटचालीचे आणि आई-वडिलांच्या परिश्रमाचे सार्थक करून उत्कृष्टरित्या एम.एस.सी. एम्ब्रियोलॉजिस्ट (भ्रूण शास्त्रज्ञ) झाला आहे. सध्या समर्थ हॉस्पिटल टेस्ट ट्यूब बेबी अँड आईवीएफ सेंटर गोंदिया या ठिकाणी स्वतंत्ररित्या काम पाहत आहे. असे त्यांचे मामा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी म्हटले असून त्यांनी या यशासह दैदीप्यमान प्रगतीबद्दल शेख ज़ाफ़र चे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.





# रानभाज्या मानवी आरोग्यासाठी वरदान : नंदकिशोर मुंदडा

## केज येथे पार पडला रानभाजी महोत्सव

**केज । प्रतिनिधी**

रानभाज्या या सहजा सहजी आपल्या परिसरात उपलब्ध होऊ शकतात. त्याचा उपयोग आहारात आवश्य केला पाहिजे. करटोली भाजी ही मधुमेह रोगासाठी, पुदिना हा दमा खोकल्यासाठी गुणकारी असून पाथरी व अंबाडी ची भाजी ही पित्तनाशक आहे. तर कपाळफोडी भाजीचा रस कानदुखीसाठी, गुळवेल हा ताप, कावीळ, जळजळसाठी गुणकारी असून केना हा त्वचा विकार व सूज कमी करण्यासाठी उपयोगी आहे. त्यामुळे रानभाज्या या मानवी आरोग्यासाठी वरदान आहेत. असे प्रतिपादन जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा यांनी केले.

केज येथील पंचायत समितीच्या सभागृहात कृषि विभाग कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा व उमेद अभियान यांच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुश इंगळे, केजचे तहसीलदार राकेश गिड्डे, भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष राहुल गदळे, गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने, तालुका कृषि अधिकारी सागर पठाडे, बालविकास अधिकारी शोभा लटपटे, गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांची प्रमुख उपस्थिती होती. ज्या शेतकऱ्यांनी रानभाज्या उपलब्ध केल्या त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक तालुका कृषि अधिकारी सागर पठाडे यांनी, सूत्रसंचालन आत्माचे बीटीएम योगेश पाटील यांनी तर आभार उमेश माळी यांनी मानले. महोत्सवास सर्व मंडळ कृषि अधिकारी, उपकृषि अधिकारी, सहाय्यक कृषि अधिकारी यांच्यासह नागरिक, महिला उपस्थित होत्या.

२५ प्रकाराच्या रानभाज्या उपलब्ध महोत्सवात तांदूळजा, माठ, आळु, हादगा फुलं, करटोली, अंबाडी, गुळवेल, पुदिना, चिघळ, शेवगा पान, कपाळफोडी, केना, कवठ अशा २५ प्रकारच्या रानभाज्या ठेवण्यात आल्या होत्या. त्यामध्ये औषधी गुणधर्म असलेले खाण्यासाठी व त्वचा रोग यावर उपयोगी असणाऱ्या रानभाजी ठेवण्यात आल्या होत्या.

# विद्यार्थ्यांचा विकास हाच आमचा ध्यास : श्रीमती बावचकर

## भालगाव येथील शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

**केज । प्रतिनिधी**

शालेय जीवनातील महत्त्वाचा टप्पा आणि विद्यार्थ्यांचा भावी वाटचालीची दिशा ठरविणाऱ्या स्पर्धा परीक्षेतील एम टी एस या स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ भालगाव -१ येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.



व्यासपिठावर ग्रामसेवक पुजारी, प्रशासक चौरे, युवराज ढोबळे, बालासाहेब मोरे, अमीन पठाण, मयूर सुरवसे, गिरी भगवान, उत्तमराव सुरवसे मेजर, राजेभाऊ मोरे मेजर,अरविंद मोरे उपस्थित होते. जिद्द आणि कष्ट याला मार्गदर्शनाची साथ मिळाल्यास प्रत्येक विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो म्हणून विद्यार्थ्यांचा विकास हाच आमचा ध्यास असल्याचे शाळेच्या शिक्षिका श्रीमती बावचकर बोलताना सांगितले. भालगाव १ येथील जिल्हा परिषद शाळेतून एम टी एस.या शासनाच्या मान्यता प्राप्त स्पर्धा परीक्षेत आरोही गोविंद कांबळे व कृष्णिका शरण मिटकरी यांनी गोल्ड मेडल, सिद्धी खंडू विभुते, सृष्टी बापूसाहेब मोरे, सृष्टी रमेश पारडे यांनी सिल्वर मेडल पटकावले तर सिद्धेश्वर खंडू विभुते, अमृता किशोर जाधव, संजीवनी चंद्रकांत कांबळे, समृद्धी दत्ता कांबळे हे विद्यार्थी पास झाले आहेत. त्याचबरोबर उर्दू शाळेचे मुख्याध्यापक खतीब तसेच श्रीमती बावचकर मॅडम यांचाही चांगल्या कार्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अजय काळे, उर्दुचे मुख्याध्यापक खतीब, शिक्षिका बावचकर, श्रीमती.दहिभाते, फरहत बाजी यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आज बलभीम नगर पेठ बीड येथे श्री क्षेत्र वेताळ बाबा मंदिर येथे संस्थान च्या वतीने महाप्रसादाचे आयोजन मार्गदर्शक डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थिती कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी उपस्थित रुस्तम भाऊ बेंद्रे, प्रकाशेठ तोतला, अमोल पौळ, विकास यादव, सचिन भाऊ चव्हाण, कल्याणराव लांडगे, स्वप्निल हातागळे, अमोल जाधव, रवी लांडगे, संतोष बेंद्रे, अनंत शिंदे, अभिजीत गायकवाड, राम क्षीरसागर, पैलवान अविनाश, पोपट घाडगे, करण गायकवाड, आदित्य जाधव, भैय्या खाटीक मारे, राजू साबळे तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी योगेश भैय्यांचे सारथी, विशाल भाऊ यांचा वाढदिवस देखील तिथे साजरा करण्यात आला. प्रभागातील प्रलंबित कामे लवकरच पूर्ण करू असा शब्द योगेश क्षीरसागर यांनी दिला.

# अप्पर कुंडलिका धरणातुन मामला, तिगांव, चिंचोटी तलावात पाणी सोडा

## लढा दुष्काळाशी फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. राज पाटील यांची मागणी

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील सर्वात मोठी नदी असलेल्या अप्पर कुंडलिका नदीवरील सोन्नाखोटा येथे उभारण्यात आलेला अप्पर कुंडलिका प्रकल्प तसेच उपळे येथे उभारण्यात आलेला कुंडलिका प्रकल्प मागील अनेक दिवसांपासून तुडुंब भरला असून वरच्या बाजूला झालेल्या पावसाचे पाणी नदीपात्रातून खाली वाहून जात आहे. हे पाणी मामला, चिंचोटी आणि तीगांव या लघु प्रकल्पांना सोडले तर ते लघु प्रकल्प तुडुंब भरतील कारण लघु प्रकल्पात अत्यल्प पाणीसाठा आहे. या लघु प्रकल्पांना पाणी सोडण्यासाठी पाटबंधारे विभागाने तत्काळ पावले उचलावीत आणि दुष्काळी भागाला मदत करावी अशी मागणी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष एडवोकेट राज पाटील यांनी केले आहे.



बीड जिल्ह्याच्या इतर भागांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू आहे अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे अनेक जलप्रकल्प पाण्याने तुडुंब भरलेले आहेत. वडवणी तालुक्यात सर्वात मोठी नदी असलेली कुंडलिका नदी ही बीड तालुक्यातून वाहत येते. वरच्या बाजूला मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे वडवणी तालुक्यातील अप्पर कुंडलिका प्रकल्प आणि उपळी येथील कुंडलिका प्रकल्प तुडुंब भरलेले आहेत. वडवणी तालुक्यात मात्र अद्यापही मोठ्या प्रमाणात पाऊस झालेला नसल्यामुळे या तालुक्यातील पाण्यावर अवलंबून असलेले साधे लघु प्रकल्प देखील भरलेले नाहीत. या तालुक्यातील मामला, चिंचोटी, साळिंबा आणि तीगाव हे लघू प्रकल्प अद्यापही २० ते २५ टक्के भरलेले आहेत. त्यामुळे इथं जलसाठा होणे आवश्यक आहे. पावसाळा केवळ एक महिना राहिला आहे. आणि पुढच्या काळात पाऊस पडेल असे चिन्ह दिसत नाहीत. सध्याही वडवणी तालुक्यात अत्यंत कमी पाऊस पडलेला आहे. त्यामुळे तीगाव, चिंचोटी आणि मामला या भागातील दुष्काळी परिस्थिती टाळण्यासाठी या तलावात सोन्नाखोटा येथील अप्पर कुंडलिका प्रकल्पाचे पाणी बंदिस्त पाईपलाईन द्वारे सोडण्यात यावे अशी मागणी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष तथा तीगावचे सरपंच राज पाटील यांनी प्रशासनाकडे केली आहे.

### आमदार प्रकाश दादांची घेतली भेट

माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके हे विकासाच्या दृष्टीने वेळोवेळी प्रयत्नशील असतात. माजलगाव मतदार संघातील अनेक प्रश्न ते सहजपणे सोडवतात हा प्रश्न देखील आमदार प्रकाश दादा सोळंके प्रशासनाकडून सोडवून घेतील याची खात्री एडवोकेट राज पाटील यांना आहे. त्यामुळे त्यांनी आमदार प्रकाश दादा सोळंके यांची सोमवारी सकाळी भेट घेऊन हा प्रश्न त्यांच्यासमोर मांडला. आमदार दादांनी तत्काळ प्रशासनाला या संदर्भात पावले उचलण्यासंदर्भात सुचना केली आहे.

### अन्यथा टँकरने पाणी प्यावे लागते

वडवणी तालुक्यातील मामला, चिंचोटी, तीगाव, चिंचाळा, पिंपरखेड, राजा हरिचंद्र पिंपरी या परिसरात दरवर्षी कमी पाऊस पडतो मात्र हे लघु प्रकल्प जर पाण्याने भरले तर या भागातील पाणी पातळी थोडीफार का होईना टिकून राहते. मात्र या वर्षी लघु प्रकल्प केवळ २५ टक्के भरलेले आहेत पावसाळा संपत आलेला आहे आणि जर लघु प्रकल्प भरले नाहीत तर उन्हाळ्यामध्ये या भागातील जलस्त्रोत खूप खोलवर जातो आणि या भागात पिण्याच्या पाण्याची देखील पंचायत होते त्यामुळे टँकरने पाणी पुरविण्याची वेळ या भागातील गावावर येते. हे टाळण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलावेत आणि या तलावात पाणी सोडण्याचा प्रयत्न करावा अशी मागणी लढा दुष्काळाशी फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. राज पाटील यांनी केली.



# मांजरा धारण तुडुंब भरले; आ. नमिता मुंदडांनी केले जलपूजन

## धरण भरल्याने शेतकऱ्यांना दिलासा, पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटला : आ. मुंदडा

**केज । प्रतिनिधी**

धनेगाव - येथील मांजरा धरण यंदा पूर्ण क्षमतेने भरल्याने केज मतदारसंघातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून अनेक गावांचा पाणीपुरवठा आणि सिचानाचा प्रश्न मार्गी लागला आहे. रविवारी सकाळी आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी धरणस्थळी भेट देऊन जलपूजन केले. या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, पन्नगेश्वर कारखान्याचे चेअरमन अक्षय मुंदडा, सुनील गलांडे, संजय गंभीरे, भगवान केदार यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

धरण परिसरात बोलताना आ. नमिता मुंदडा म्हणाल्या की, यंदा समाधानकारक पाऊस झाल्याने धरण लवकर भरले असून त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. धरण भरल्याने सिंचन व पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटला आहे. दरवर्षी धरण भरावे यासाठी वरुणराजाकडे प्रार्थना केली आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी धरणाचे अभियंता यांच्याशी संवाद साधला. सध्याच्या घडीला धरणाचे चार दरवाजे उघडण्यात आले असून नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. नदीकाठच्या शेतकऱ्यांनी सुरक्षिततेसाठी दक्षता घ्यावी, असे आवाहन करताच यासंदर्भातील सर्व सूचना शासनस्तरावरून देण्यात आल्याचेही आ. मुंदडा यांनी सांगितले.

## शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शिक्षकांच्या बदल्या रद्द करण्याची ग्रामस्थांची मागणी

# लिंबागणेशकर पालकांचा आक्रमक पवित्रा

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत संवर्ग १ ते ४ मधील तब्बल ५ पैकी ४ शिक्षकांच्या प्रशासकीय बदल्या झाल्या असून या निर्णयाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. अचानक झालेल्या या बदल्यांमुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याने ग्रामस्थांनी बदल्या तात्काळ रद्द करण्याचे निवेदन शिक्षणमंत्री दादा भुसे, खा. बजरंग सोनावणे, आ. संदिप क्षीरसागर तसेच जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांना सादर केले आहे. बदल्या रद्द न झाल्यास पालक रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.




**ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन समितीचा ठराव**

आज (दि. १८) सकाळी ग्रामपंचायत कार्यालयात तसेच शाळेत पालक व ग्रामस्थांची तातडीची बैठक झाली. या बैठकीत ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन समितीने ठराव मंजूर केला असून, त्यासह पालकांच्या स्वाक्षरीचे पत्र जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींना पाठवण्यात आले आहे. या बैठकीस शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर वाणी, पत्रकार हरिओम क्षीरसागर, लेनाजी गायकवाड, अँड. गणेश वाणी, विक्रांत वाणी, दिनेश जाधव, संतोष भोसले, अशोक वाणी, रामदास मुळे, अभिजित गायकवाड, चेतन कानिटकर, तुकाराम गायकवाड, अशोक थोरात, मंगेश जाधव, आनंद बारगजे, संदिप मुळे आदी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गुणवत्ता वाढवणारे शिक्षक गमावण्याचा धोका**

लिंबागणेश शाळेत इयत्ता १ ते ४ पर्यंत सुमारे १२५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुख्याध्यापक आबासाहेब हांगे व शिक्षक अमर पुरी, संदिपान आगाम, भरत चौरे, माधुरी कुलकर्णी यांच्या प्रयत्नांमुळे या शाळेची गुणवत्ता लक्षणीयरीत्या वाढली आहे. इतकेच नव्हे तर गावातील इंग्लिश स्कूलमध्ये शिकणारी मुलेही पुन्हा जिल्हा परिषद शाळेत दाखल झाली आहेत. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक कुलकर्णी यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक केले होते. अशा परिस्थितीत या शिक्षकांची बदली म्हणजे मुलांच्या भवितव्याशी खेळ असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

**आंदोलनाची हाक**

शिक्षकांच्या बदल्या रद्द न झाल्यास लिंबागणेशकर रस्त्यावर उतरून आंदोलन छेडण्यास भाग पाडले जाईल, असा इशारा पालक व ग्रामस्थांनी दिला आहे.

# ईद-ए-मिलादुन्नबी जयंती समितीच्या अध्यक्षपदी सय्यद सलीमबापू

**माजलगाव । प्रतिनिधी**

५ सप्टेंबर रोजी साजऱ्या होण्याऱ्या ईद-ए-मिलादुन्नबी जयंतीनिमित्त अहले सुन्नतवल जमाअत कमीटी उत्सव समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ नेते सय्यद सलीमबापू यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली उत्सवाच्या तयारीस प्रारंभ झाला असून जुलुस, धार्मिक व सामाजिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समिती सक्रिय झाली आहे. दरम्यान सलीमबापू यांच्या अध्यक्षतेखाली विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात येणार असून, त्यांची ही निवड समितीकडून तिसऱ्यांदा करण्यात आली आहे.



इस्लाम धर्माचे सर्वश्रेष्ठ हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती म्हणून ईद-ए-मिलाद साजरी केली जाते. ह.मोहम्मद पैगंबर हे अल्लाहचे अंतिम प्रेषित होते. इस्लामच्या धारणेनुसार अल्लाहने त्यांच्या मार्फत कुराण हा धर्मग्रंथ लोकांपर्यंत पोहोचवला. इस्लाम मध्ये ईद-ए-मिलाद हा सर्वात मोठा दिवस मानला जातो. हजरत मोहम्मद पैगंबर यांनी त्यांच्या आयुष्यात नेहेमीच शांततेचा संदेश दिला आहे. त्यांच्या या शिकवणीची आठवण त्यांनी दिलेल्या कुराणची शिकवण ही सर्वसामान्य नागरिकांच्या लक्षात राहावी आणि त्यांनी आपल्या जीवनात ती अमलात आणावी यासाठी ईद मिलादुन्नबी साजरी केली जाते. यानिमित्त शहरातील आझाद नगर भागात १७ ऑगस्ट रोजी बैठक पार पडली. यावेळी ५ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त साजरी होणाऱ्या उत्सव समितीच्या अध्यक्षपदी या भागातील ज्येष्ठ नेते सय्यद सलिमबापु यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. दरम्यान ईद ईद मिलादुन्नबी निमित्त शहरात जुलूस मिरवणूक काढण्यात येणार आहे. मज्जीद मध्ये धार्मिक प्रवचन करण्यात येणार आहे. मिठाई, सरबत वाटप केली जाणार आहे.

त्याचप्रमाणे विविध धार्मिक कार्यक्रमाची मेजवानी नागरिकांना अनुभवास मिळणार आहे. जशने मिलाद मध्ये सहभागी होण्याचे आवाहन जयंती अध्यक्ष सय्यद सलिमबापु, सय्यद सिराजोद्दीन कादरी, सय्यद युसुफोदीन कादरी आगा खान साहब, शेख महेबुब, शेख मुस्तकीम, सय्यद रईसोद्दीन कादरी, मिर्झा महेमुद, शेख आसेफ भाऊ सय्यद रहीम फिटर, सय्यद समीर, सय्यद मुदस्सीर, शेख हारून फिटर, शेख अख्तर, शमशेर पठाण, सय्यद तौफिक, अहले सुन्नतवल जमाअत कमीटी माजलगाव कडुन सय्यद अली खतीब आसेफ, शेख महेबुब, सय्यद शफिक भाऊ, शेख इलियास, शेख गुलाब, शेख चुन्नु, सय्यद तौफिक कादरी, सय्यद फारुख अण्णा यांनी केले आहे.

# बार्शी नाका रेल्वे स्टेशनचे काम त्वरित सुरु करा : खुर्शीद आलम

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार १५ ऑगस्ट निमित्ताने बीडच्या दौऱ्यावर आले होते या यावेळी बार्शी नाका रेल्वे स्टेशन कृती समितीच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री यांना भेटून निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की बीडचे रेल्वे स्टेशन बार्शीनाका इमामपूर रोड प्रकाश आंबेडकर नगर येथेच मंजूर आहेत असे असतानाही सदर रेल्वे स्टेशन पालवन येथे म्हणजे बीड शहराच्या ७ ते ८ कि.मि. दुर बांधण्यात आले आहेत, त्यामुळे लोकांची गैरसोय झाली आहे.

पालवन रेल्वे स्टेशनवरून नगरला जाण्यासाठी पन्नास रुपये लागणार आहेत तर बीड शहरातून पालवण स्टेशनवर जाणेसाठी शंभर ते दीडशे रुपये खर्च होणार आहेत म्हणून पालवन रेल्वे स्टेशन नागरिकांना परवडणारे नाहीत म्हणून बार्शीनाका इमामपुर रोडवर रेल्वे स्टेशन थांबा चे काम त्वरित सुरू करावे कारण बार्शी नाक्यावरून शेतकऱ्यांना आणि सर्वच नागरिकांना नवा आणि जुना मोंढा, कृषी उत्पन्न बाजार समिती, एमआयडीसी, आठवडी बाजार, आडत मार्केट, बस स्टॅन्ड, जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, समाज कल्याण ऑफिस, जिल्हा रुग्णालय, एसपी ऑफिस, जिल्हा न्यायालय, शासकीय दूध डेरी, महिला रोगणालय, जिल्हा क्रीडांगण आणी जवळपास ९५ टक्के शाळा महाविद्यालय हे बार्शीनाका इमामपुररोड रेल्वे स्टेशनवरून जवळ आहेत.



बार्शी नाका रेल्वे स्टेशनचे चारो दिशेने नॅशनल हायवे असल्यामुळे बार्शी रेल्वे स्टेशन वर ट्राफिक होणार नाही विशेष म्हणजे बार्शीनाका इमामपुर रेल्वे स्टेशनवर रेल्वेत बोर्डाने यापूर्वीच जमीनी खरेदी करून चार मोठ्या बिल्डिंग तयार केलेले आहेत म्हणूनच बार्शी नाका इमामपुर रोडवर रेल्वे स्टेशन (रेल्वे थांबा) चे काम त्वरित सुरू करावे अशी नम्र विनंती बार्शी नाका इमामपुर रोड रेल्वे स्टेशन कृती समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे करण्यात आली असता उपमुख्यमंत्री दादांनी सदर निवेदन लक्षपूर्वक वाचले आहे, यावेळी कृती समितीचे कार्य अध्यक्ष खुर्शीद आलम, गोरख शिंगण, नगरसेवक अमोल पऊड, शेख अखील भाई, शनेश्वर गायकवाड, शेख युनुस भाई, आदी मान्यवर उपस्थित होते,

# लाईट विभागाच्या निष्क्रिय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमुळे पिसेगाव येथील पांचाळ वस्तीच्या नागरिकांना होतोय नाहक त्रास

**केज । प्रतिनिधी**

केज शहरापासून पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या पिसेगाव येथील पांचाळ वस्तीला गेल्या तीन वर्षापासून लाईट येत नाही. पांचाळ वस्ती येथील नागरिक सातत्याने लाईट विभागांमध्ये तोंडी आणि लेखी तक्रारी करून कंटाळून गेली आहेत. केज येथील लाईट विभागातील निष्क्रिय अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळे या लोकांना नाहाक त्रास भोगाव लागतो. अधिकारी आणि कर्मचारी हे उडवा उडवीची उत्तर देतात, जर केज पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या गावाची ही परिस्थिती असेल, तर तुम्हीच सांगा खेड्यापाड्यामध्ये या लाईट विभागातील अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांचा किती मगरुर पणा असेल, पांचाळ वस्ती येथे साधा बल्प सुद्धा नीट लागत नाही. पाठपुरावा करून आणि अधिकाऱ्यांना सांगून फोन करून त्या पांचाळ वस्तीवरील लोक खूप कदरले आहेत.



मताचे राजकारण करणारे भामटे पुढारी याकडे लक्ष देतील देतील काय याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले आहे. निवडणुका आल्या की आश्वासन द्यायची. निवडणूक संपल्या की लोकांना साधे विचारायचे सुद्धा नाही. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना पांचाळ वस्ती येथील नागरिकांनी सांगितले आहे की आमच्या लाईटचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावला नाही तर आम्ही पांचाळ वस्ती येथील सर्वच नागरिक लाईट विभागाला कुलूप ठोकणार आहोत. आता तरी या कडे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी लक्ष देऊन पांचाळ वस्तीचा लाईट विषय मार्गी लावला पाहिजे.

# ग्रामरोजगार सेवकाचा मुजोरपणा; महिला सरपंचाला अश्लील भाषेत शिवीगाळ

**आष्टी । प्रतिनिधी**

अरणविहरा गावातील काही ग्रामस्था सोबत बोलणे सुरू असताना याच दरम्यान बिनबुडाचे आरोप करत अपशब्द वापरून महिला सरपंचाला अश्लील भाषेत शिवीगाळ करण्याचा मुजोरपणा येथील ग्रामरोजगार सेवकाने केला असल्याने याप्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. आष्टी तालुक्यातील अरणविहरा, तागखेल ग्रुप ग्रामपंचायत असून येथे लोकनियुक्त महिला सरपंच यांचे पती १३ ऑगस्ट रोजी ग्रामस्थासोबत गावातील काही विकासकामा बद्दल चर्चा करत असताना याच वेळी गावातीलच राजू रघुनाथ रामगुडे या ग्रामरोजगार सेवकाने मुजोरपणा करत महिला सरपंच यांच्यावर बिनबुडाचे आरोप करत अश्लील भाषेत शिवीगाळ केली.

दुसर्या व्यक्तीने सरपंचपती यांना सरपंच नालायक आहे. आम्ही बोलणार आमच कार्य आहे. आमचं काय वाकड करायचे ते करा असे उध्धटपणाचे शब्द देखील सुनावले. महिला सरपंचांच्या चारित्र्याचा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. सदरील मुजोर ग्रामरोजगार सेवकावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार सरपंच पती यांनी याप्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. ग्रामरोजगार सेवकावर कठोर कारवाई व्हावी. महिला सरपंच गावात उपस्थितीत नसताना त्यांना सार्वजनिक ठिकाणी असभ्य वर्तन करून शिवीगाळ करणे योग्य नाही. अश्या आडमुठ्या व मुजोरपणा करणाऱ्या ग्रामरोजगार सेवकावर कठोरातील कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

## बीड शहरातील रस्त्यांचे वाटोळे: क्षीरसागर बंधूंसह स्थानिक नेते घेऊ लागले श्रेय, श्रेय घेण्यापेक्षा बीड शहराचा विकास करुण दाखवावा : ॲड. शेख शफीक

# नेते तुपाशी आणि कार्यकर्ते टक्केवारीसाठी उपाशी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिक त्रस्त असताना, स्थानिक नेते आणि क्षीरसागर बंधूंवर श्रेयवादाचा आरोप करत, मा -खचखच् बीड जिल्हा अध्यक्ष ड शफीक भाऊ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडच्या विकासासाठी दिलेल्या १०० कोटींच्या निधीचा वापर खरोखरच विकासासाठी होणार की स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी, असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बीडकरांनी या नेत्यांना जागा दाखवावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

**रस्त्यांचे हाल आणि नागरिकांचा संताप**

बीड शहरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. खड्ड्यांनी भरलेले रस्ते, अपुरी ड्रेनेज व्यवस्था आणि रस्त्यांवरील विद्युत खांब यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. यासंदर्भात स्थानिक आमदार, स्थानिक सत्तेतले नेते, कार्यकर्ते सह निधी उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा केल्याचे सांगितले जात आहे. तथापि, शफीक भाऊ यांनी हा दावा फोल ठरवत, क्षीरसागर बंधूंनी आणि स्थानिक नेते सह फक्त आतापर्यंत केवळ श्रेय घेण्यासाठी आटापीटा केला, प्रत्यक्षात कामात अडथळे आणण्याचाच त्यांचा उद्योग आहे, आणि टक्केवारीसाठी आणि कार्यकर्ते पोसण्यासाठी हे हे जनतेची दिशाभूल करतात असा घणाघाती आरोप केला आहे.



**१०० कोटींच्या निधीवर प्रश्नचिन्ह**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडच्या विकासासाठी १०० कोटींचा निधी जाहीर केला आहे. यामध्ये रस्ते, नाले आणि शहर सुशोभीकरणासाठी १० कोटींचा समावेश आहे, असे सांगितले जाते. मात्र, या निधीचा वापर खरोखरच शहराच्या विकासासाठी होणार की, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय लाभासाठी, याबाबत शफीक भाऊ यांनी शंका उपस्थित केली आहे. नगर परिषदेत आतापर्यंत सत्ता भोगली, पण विकास झाला नाही. आता हा निधी स्वतःच्या फायद्यासाठी वापरला जाणार तर नाही ना? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

**निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर टीका तीव्र**

येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीडमधील राजकीय वातावरण तापले आहे. क्षीरसागर बंधूंवर श्रेय घेण्याचा आणि विकासकामात अडथळे आणल्याचा आरोप करत, शफीक भाऊ यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, बीडकरांनी या नेत्यांना आता निवडणुकीत जागा दाखवावी आणि खऱ्या अर्थाने विकासाला चालना द्यावी.

**स्थानिकांचा उद्रेक आणि अपेक्षा**

बीड शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. रस्त्यांसाठी निधी मंजूर होतो, पण कामे का होत नाहीत? नेते फक्त घोषणा करतात, प्रत्यक्षात काहीच बदल दिसत नाही, अशी भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली आहे. यापूर्वीही बीड शहरातील रस्त्यांसाठी ७० कोटी आणि जिल्ह्यातील रस्त्यांसाठी २५१ कोटींचा निधी मंजूर झाला होता, पण त्याचा प्रत्यक्ष परिणाम दिसून आलेला नाही, अशी टीका होत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT